**महाराष्ट्र विधानसभा**
**दुसरे अधिवेशन, २०२५**

----------------------------

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक ०९ जुलै, २०२५ / आषाढ १८, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्ये मंत्री** | |
| **(३)** | **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री** | |
| **(४)** | **शालेय शिक्षण मंत्री** | |
| **(५)** | **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** | |
| **(६)** | **पणन, राजशिष्टाचार मंत्री** | |
| **(७)** | **क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ मंत्री** | |
| **(८)** | **वस्त्रोद्योग मंत्री** | |
| **(९)** | **सहकार मंत्री** | |

-----------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ३५**

-----------------------------

**शालेय शिक्षण विभागाने जाहिर केलेल्या संच मान्यतेच्या निकषांबाबत**

**(१) * ९०२५ श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शैक्षणिक सत्र २०२४-२०२५ करिता शासनाने दिनांक १५ मार्च, २०२४ रोजी जाहीर केलेल्या संच मान्यतेचे सुधारित निकषांनुसार विद्यार्थ्यांच्या पटसंख्येच्या आधारे शिक्षक व मुख्याध्यापकांची पदसंख्या निश्चित केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी ६१ विद्यार्थ्यांमागे ३ शिक्षक असे असणारे प्रमाण, आता ७६ विद्यार्थ्यांनंतर तिसरा शिक्षक असे असून इयत्ता सहावी ते आठवीसाठी, नववी-दहावीच्या शिक्षक मंजुरीत बदल करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील सुधारणांमुळे राज्यातील सुमारे २५ हजार शिक्षक अतिरिक्त ठरून अनेक शाळांमध्ये मंजूर शिक्षक पदसंख्या शून्य झाल्यामुळे त्या शाळा बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सुधारित संच मान्यतेनुसार केवळ आधार कार्ड असलेल्या विद्यार्थ्यांचीच पटसंख्या ग्राह्य धरण्यात आल्याने सुधारित निकषांविरुद्ध विविध शिक्षक संघटनांनी तीव्र आक्षेप घेतले असून मा.उच्च न्यायालयाने या सुधारित संच मान्यतेस तात्पुरती स्थगिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, नवीन संच मान्यतेमुळे बालकांचा शिक्षणाचा हक्क, शाळा जवळ असण्याची गरज, शिक्षकांच्या नोकऱ्यांची सुरक्षितता आणि गुणवत्तेवर परिणाम होणार असल्यामुळे सुधारित निकष रद्द करून पूर्वीप्रमाणे संच मान्यता लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे. शासन निर्णय दि.१५.०३.२०२४ नुसार इ. १ ली ते ५ वी या गटामध्ये आरटीईच्या निकषानुसार आवश्यक असलेल्या ३० विद्यार्थी संख्येच्या निम्म्यापेक्षा जास्त विद्यार्थी म्हणजेच १६ विद्यार्थी असल्यास पुढील पद देय ठरते. मागील वर्षी ३ शिक्षक मंजूर असल्यास इ. १ ली ते ५ वी करीता ३ ऱ्या शिक्षक पदास ६१ विद्यार्थी संख्येपर्यंत संरक्षण देय ठरते. दि.१५.०३.२०२४ च्या शासन निर्णयातील तरतूदींच्या आधारे इ. ६ वी ते ७/८ वी या गटात किंवा कोणत्याही इयत्तेत २० पेक्षा कमी पट संख्या असल्यास त्या गटासाठी किमान १ शिक्षक अनुज्ञेय करून सन २०२४-२०२५ च्या संचमान्यता निर्गमित करण्याबाबत शासन पत्र दि.१०.०३.२०२५ व दि.२६.०३.२०२५ शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे अन्वये कळविण्यात आले आहे. त्यामुळे शाळा शिक्षकाविना राहणार नाही. तसेच, दि.१५.०३.२०२४ च्या शासन निर्णयातील इ. ९-१० वी च्या निकषामध्ये शिथिलता देण्याच्या अनुषंगाने शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाला असून यानुषंगाने शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(४) हे अंशत: खरे आहे. शिक्षण संस्थांमधील अतिरिक्त/खोट्या विद्यार्थीसंख्येबाबत श्री. पी. व्ही. हरदास, माजी न्यायमूर्ती, मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या शिफ़ारशीनुसार संचमान्यता निर्धारित करताना आधार प्रमाणित विद्यार्थीसंख्या विचारात घेतली जाते. शासन निर्णय दि.१५.०३.२०२४ मधील संचमान्यतेच्या सुधारीत निकषांच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयामध्ये सदर शासन निर्णयास स्थगिती देण्यात आलेली नाही.
(५) दि.२८.०८.२०१५ च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने तत्कालीन अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन समितीच्या बैठका होऊन आयुक्त (शिक्षण), पुणे यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार दि.१५.०३.२०२४ च्या शासन निर्णयान्वये संचमान्यतेचे सुधारीत निकष विहित करण्यात आले आहेत. सदर निकषांमध्ये दि.१९.०९.२०२४ व दि.०९.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजीव गांधी विद्यार्थी अपघात योजना सानुग्रह अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(२) * १२५७० श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतच्या सर्व शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित व स्वयंअर्थसंचालित शाळांमध्ये राजीव गांधी विद्यार्थी अपघात योजनेंतर्गत मृत्यू किंवा कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास संबंधित विद्यार्थ्याच्या आईच्या बँक खात्यावर थेट सानुग्रह अनुदान जमा केले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवेखेड (ता. खानापूर, जि.सांगली) येथे सदर योजनेंतर्गत विद्यार्थ्यांचे सुमारे रु.४०,४४,३४०/- इतके सानुग्रह अनुदान प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांची आर्थिक गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रलंबित सानुग्रह अनुदान त्वरीत अदा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) शिक्षण संचालक (योजना), यांच्याकडून एकूण ४७९ लाभार्थ्यांबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. यामध्ये सांगली जिल्ह्यातील एकूण ३० लाभार्थ्यांचा समावेश आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने निधी वितरणास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव नियोजन विभाग व वित्त विभागास सादर करण्यात आला आहे. नियोजन विभाग व वित्त विभागाकडून मान्यता प्राप्त होताच सदर निधी शिक्षण संचालक (योजना) यांच्यामार्फत सर्व संबंधित जिल्ह्यांना वर्ग करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने शिक्षक भरतीत केलेला गैरव्यवहार

**(३) * १२९१६ श्री.गजानन लवटे (दर्यापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१२ पासून शिक्षक भरती प्रक्रिया बंद असतानाही अमरावती जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत “बॅक डेट” नियुक्त्या करून कोटयवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्पसंख्याक शाळांना दर्जा मान्यता देण्याच्या प्रक्रियेमध्येही मोठया प्रमाणावर अनियमितता व गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील दोन्ही प्रकरणांबाबत दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरात डोंगराळ वस्तीत वास्तव्य करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत

**(४) * ११३९८ श्री.सुनील राऊत (विक्रोळी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रोळी (पूर्व) मुंबई मधील सुर्यानगर येथील शिव महाराष्ट्र नगर ते सनसीटी ही संपूर्ण वस्ती डोंगराळ भागावर वसलेली असल्याने पावसाळयात दरड कोसळून जिवीतहानी व वित्तहानी होण्याची दाट शक्यता असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईतील विक्रोळी पार्कसाईट (प.), साकीनाका, भांडुप, घाटकोपर या भागात डोंगरावर असलेल्या वस्त्यांमधील नागरिक गेली अनेक वर्ष जीव मुठीत घेऊन जीवन जगत असल्याची बाब दिनांक २ जून, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर डोंगराळ भागात संरक्षक भिंत व जाळी बसविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिनींनी संबंधित विभागाकडे सातत्याने पत्रव्यवहार करुनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त डोंगराळ भागात संरक्षक भिंत व जाळी बसविण्यासाठी निधी उपलब्ध करुन नागरिकांच्या सुरक्षेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका "एस" विभागातील बहुतांश भाग डोंगराळ वस्तीचा आहे. भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण (Geological Survey of India) यांनी केलेल्या पाहणीच्या अनुषंगाने सुर्यानगर, विक्रोळी हे संभाव्य भूस्खलनाची शक्यता असणारे धोकादायक ठिकाण म्हणून निश्चित करण्यात आले आहे.

(२) विक्रोळी पार्कसाईट (प.), साकीनाका, भांडुप, घाटकोपर हा भाग बहुतांश डोंगराळ वस्तीचा असून, भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण (Geological Survey of India) यांनी केलेल्या पाहणीच्या अनुषंगाने "एस" विभागात १६१ ठिकाणी दरड कोसळण्याचा संभाव्य धोका आहे व त्यापैकी १३ ठिकाणे ही मध्यम ते गंभीर या प्रवर्गात आहेत. तसेच, डोंगराळ भागात जिवित व वित्त हानी टाळण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आधार भिंतीलगत व संभाव्य दरड कोसळणाऱ्या भागातील घरांना सावधान नोटिसा देऊन घरे रिक्त करण्यात येतात व तेथे सावधान फलक ही लावण्यात येतात. तसेच, महानगरपालिकेमार्फत अति धोकादायक वास्तुमधील रहिवाशांना तात्पुरत्या निवासी केंद्रात स्थलांतरीत करण्यात येते.

(३) लोकप्रतिनिधी/स्थानिक रहिवाशांकडून प्राप्त तक्रारी/अर्जाच्या अनुषंगाने सुर्यानगर या ठिकाणी संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्याकरीता सन २०२१-२२ ते २०२४-२५ या कालावधीत जिल्हा नियोजन समितीमार्फत ४७ कामांना रुपये ११.६३ कोटी इतक्या रकमेची प्रशासकीय मंजुरी देऊन निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) सूर्यानगर, विक्रोळी येथील संभाव्य भुस्खलनाच्या ठिकाणी जिओ नेटिंगचे काम करण्याकरीता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले असून सदर काम तातडीने हाती घेण्यात आले आहे. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास वर्ग केलेले रुपये ९ कोटी बृहन्मुंबई महानगरपलिकेस उपलब्ध करुन देण्यासंदर्भात केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने अतिरिक्त कागदपत्रे/माहिती मागविण्यात आली असून त्यांची पूर्तता झाल्यावर बृहन्मुंबई महानगरपलिकेस निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आरटीई प्रवेश प्रक्रियेअंतर्गत बनावट कागदपत्रांचा वापर केल्याबाबत**

**(५) * ८८१६ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना खाजगी शाळांमध्ये प्रवेश मिळावा याकरिता शासनातर्फे राबविण्यात येत असलेल्या "आरटीई" अंतर्गत नोंदणी करताना, खारघर, (ता.पनवेल, नवी मुंबई) येथील काही पालकांनी बनावट पत्त्यांचा वापर केल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रवेश प्रक्रियेतील स्थानिक शाळांची अट पूर्ण करता यावी म्हणून काही पालकांनी बनावट पत्त्याचा वापर केल्याच्या तक्रारीनुसार केलेल्या चौकशीत १३ विद्यार्थ्यांचे पत्ते बनावट असल्याचे निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारांना आळा बसावा आणि पालकांना त्यांच्या पसंतीनुसार शाळांमध्ये प्रवेश घेता यावा, याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर प्रकार राज्यातील इतर भागांत घडू नये यासाठी शासनामार्फत कोणत्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदींनुसार सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरीता २५ टक्के प्रवेश प्रक्रियेंतर्गत पनवेल तालुक्यातील एकूण ११३ पात्र शाळांमधील २५०१ जागांकरीता ऑनलाईन सोडतीद्वारे निवड झालेल्या २२०३ विद्यार्थ्यांचे तालुका स्तरावरील कागदपत्र पडताळणी समितीकडून प्रवेश निश्चित करण्यात आले आहेत. याबाबत आपले सरकार पोर्टलवरील प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार केलेल्या पडताळणीअंती २४ प्रवेश रद्द करण्यात आले आहेत.

(३) व (४) आरटीई प्रवेश प्रक्रियेंतर्गत बनावट कागदपत्र तयार करू नयेत म्हणून तालुका पातळी/ वार्ड पातळी/ केंद्र पातळीवर पडताळणी समिती अधिक सक्षम करण्यात येणार आहेत. याकरीता ऑनलाईन अर्ज भरतांना आवश्यक ते सर्व कागदपत्र पालकांकडून अपलोड करून घेण्यात येणार आहेत. जे-णे करून काटेकोर पध्दतीने तपासणीसाठी पडताळणी समितीस पुरेसा वेळ मिळेल व बनावट कागदपत्रे अपलोड केल्याचे निदर्शनास आल्यास तसे प्रवेश तात्काळ रद्द करण्यात येतील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शिक्षक भरती संवर्गातील बिंदूनामावलीमध्ये भटक्या जमाती प्रवर्गावर झालेल्या अन्यायाबाबत**

**(६) * १२०८२ श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सरळसेवा शिक्षक भरती संवर्गातील बिंदूनामावली मधील तपासणीमध्ये भटक्या जमाती विशेषतः NT-C तसेच VJNT/ OBC/ SBC/ SC/ ST प्रवर्गावर झालेला अन्याय दूर करून शिक्षक संवर्गाच्या बिंदूनामावली फेरदुरुस्तीचे आदेश देऊन मागासवर्गियांचा अनुशेष काढून भरती प्रक्रिया राबविणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे मे, २०२५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शिक्षक भरती सन २०२२ मध्ये जागा उपलब्ध नसून भटक्या जमाती प्रवर्गालाही प्रचलित आरक्षणानुसार जागा उपलब्ध नसल्यामुळे इतर प्रवर्गावर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, मागासवर्गीय कर्मचारी गुणवत्तेने खुल्या प्रवर्गाच्या कट ऑफ ला सन १९९० पासून ते सन २००४ पर्यंत लागूनही बिंदू बदल करून जातीच्या आरक्षण बिंदूवर दर्शविण्यात आले आहेत, यामुळे मागास प्रवर्गावर अन्याय झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सरळसेवा भरती प्रक्रिया शासन नियमाप्रमाणे राबविली जात नसल्यामुळे मागासप्रवर्गाचा अनुशेष निघत नाही. सन २००५ ला आरक्षण कायदा आल्यानंतर कर्मचारी आदेशावर निवड प्रवर्ग लिहण्याची पद्धत आली, या सर्व बाबी मुळे मागासवर्गीयांचे आरक्षण अनुशेष निघत नाही त्यामुळे बिंदूनामावली तपासणी करताना निवडसूची शिवाय दुसरा पुरावा ग्राह्य धरू नये, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) बिंदुनामावली दुरुस्ती करुन मागासवर्गीयांचा अनुशेष निश्चित करण्यात येऊन शिक्षक भरती करण्यात यावी, अशा आशयाची निवेदने शासनास प्राप्त झालेली आहेत.
(२) शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी सन २०२२ यावर आधारित शिक्षक पदभरतीच्या पहिल्या टप्प्यात बिंदूनामावलीबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी विचारात घेऊन १० टक्के पदे राखून ठेवण्यात आली होती. टप्पा २ सुरु होण्यापूर्वी सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांना प्राप्त तक्रारीची पडताळणी करुन व बिंदुनामावलीची काटेकोर तपासणी करुनच भरती जाहीराती प्रसिध्द करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. पहिल्या टप्प्यात जाहीरात प्रसिध्द झालेल्या एकूण १६,८०६ पदांपैकी ११,९८३ पदे मागास प्रवर्गांची होती. दुसऱ्या टप्प्यात देखील मुलाखतीशिवाय या प्रकारात जाहिरात प्रसिध्द झालेल्या १६५३ पदांपैकी १०५१ पदे मागास प्रवर्गांची आहेत.
(३) व (४) सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) यांचेकडून बिंदुनामावली प्रमाणित केली जाते. त्यात काही त्रुटी आढळल्यास त्याची पूर्तता करुन प्रस्ताव फेरसादर करणेबाबत नियुक्ती प्राधिकाऱ्यास सूचित केले जाते.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माळवाडी (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील प्राथमिक शाळेत शालेय पोषण आहारामुळे विद्यार्थीनींना अन्नबाधा झाल्याबाबत

**(७) * ७५४२ श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माळवाडी (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनींना शालेय पोषण आहार घेतल्यानंतर अचानक उलट्या व जुलाब झाल्याने त्यांना कोतोली प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आल्याची घटना माहे मार्च, २०२५ मध्ये घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुलांना देण्यात येणाऱ्या पोषण आहारात शिळे जेवण, करपलेला भात तसेच शिजवलेल्या भातामध्ये अळया आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

सदर घटना शालेय पोषण आहार सेवनामुळे झालेली नाही. दि.२६ मार्च, २०२५ रोजी माळवाडी (ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर) प्राथमिक शाळेतील एका विद्यार्थीनीला आजारी असल्यामुळे उलटीचा त्रास झाला होता. सदर विद्यार्थीनीला शाळेमध्ये झालेल्या उलटीमुळे अन्य पाच विद्यार्थीनीना उलटी / मळमळीचा त्रास झालेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) घटनेच्या दिवशी शाळेमध्ये तयार केलेल्या आहाराच्या नमुन्यांची तपासणी राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे यांच्यामार्फत करण्यात आली आहे. सदर तपासणी अहवालात पोषण आहारात कोणताही दोष असल्याचे आढळून आलेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाडी केंद्रांमध्ये तीन ते सहा वर्षे वयोगटातील बालकांसाठी अभ्यासक्रम निश्चित करणेबाबत

**(८) * १२९६२ श्री.अमोल पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १,१०,६३१ अंगणवाडी केंद्रांमध्ये तीन ते सहा वर्षे वयोगटातील बालकांसाठी पहिल्यांदाच अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ पासून करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अभ्यासक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) तयार केलेल्या अभ्यासक्रमांनुसार अंगणवाडी सेविकांना राज्य महिला व बालविकास विभाग व शालेय शिक्षण विभागामार्फत प्रशिक्षण देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, केंद्र सरकारच्या ‘आधारशिला’ या अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने राज्यातील प्ले ग्रुप, नर्सरी, खासगी शिकवणी केंद्रे, संस्था व व्यक्तींच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या इतर शिक्षणप्रक्रियांनाही एकत्रित करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) तीन ते सहा वर्षे वयोगटातील बालकांसाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्यामार्फत अभ्यासक्रम तयार करण्यात आला असून अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका यांचेसाठी प्रशिक्षण हस्तपुस्तिका तयार करण्यात आलेली आहे.

(३) व (४) दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये Pre. School, Nursery, Jr. K.G., Sr. K. G., पूर्व प्राथमिक वर्ग अशा कोणत्याही नावाने सुरु असलेल्या, वयोगट ३ ते ६ मधील विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या खाजगी केंद्रांची नोंदणी करण्यासाठी Pre School Registration Portal शासनाकडून सुरु करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: विदर्भ व उत्तर महाराष्ट्रात तापी मेगा रिचार्ज प्रकल्प कार्यान्वित करणेबाबत

**(९) * ७७६९ श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: विदर्भ व उत्तर महाराष्ट्रात खारपन पट्ट्यातील शेतकरी व नागरिकांना पिण्याचे पाणी आणि सिंचनाची समस्या मोठया प्रमाणावर सहन करावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या दोन राज्यांनी तापी मेगा रिचार्ज प्रकल्पासाठी एका महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक करारावर माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान स्वाक्षरी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे विशेष करुन जळगाव, अकोला, अमरावती, बुलढाणा तसेच विदर्भातील खारपन पट्ट्यातील पिण्याच्या पाण्याची आणि सिंचनाची समस्या मार्गी लागून राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन तापी मेगा रिचार्ज प्रकल्प सत्वर कार्यान्वित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, अंशत: खरे आहे.

विदर्भाचे काही भागात खारपन पट्टा अस्तित्वात आहे.

(२) होय,

तापी खोरे महाकाय पुनर्भरण योजनेस आंतरराज्यिय नियंत्रण मंडळाच्या २८ व्या बैठकीत दि.१०/०५/२०२५ रोजी दोन्ही राज्यांच्या मा.मुख्यमंत्र्यांची योजनेच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाली आहे.

(३) सदर प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील जळगांव, अकोला, अमरावती व बुलढाणा या क्षेत्राला २,३४,७०६ हेक्टर क्षेत्रास पुनर्भरण व भूपृष्ठ सिंचनाद्वारे लाभ होईल तर मध्य प्रदेशातील १,२३,०८२ हेक्टर क्षेत्रास पुनर्भरण व भूपृष्ठ सिंचनाद्वारे लाभ मिळणार आहे.

(४) होय,

सदर प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घेण्याबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाढत्या मधुमेहाचे प्रमाण रोखण्याबाबत

**(१०) * ११८४२ श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शालेय विद्यार्थ्यांमध्ये गोडपदार्थ, साखरयुक्त पेये इत्यादींचे सेवन वाढल्यामुळे टाईप-२ मधुमेहाच्या प्रमाणात लक्षणीय वाढत होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय विद्यार्थ्यांमध्ये मधुमेहाचा धोका कमी करण्यासाठी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (CBSE) संलग्न शाळांमध्ये "शुगर बोर्ड" स्थापन करण्याचे आदेश दिले असून हे मंडळ यावर नियंत्रण ठेवण्यासाठी काम करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम राहण्यासाठी आणि मधुमेहापासून त्यांचे संरक्षण करण्यासाठी त्यांच्यात जागरुकता निर्माण होण्याच्यादुष्टीने शासनाने कोणते उपक्रम अथवा कार्यशाळा आयोजित केल्या वा करण्यात येणार आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील शासनाच्या शाळांमध्ये "शुगर बोर्ड" स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) शालेय शिक्षण विभागाच्या कोणत्याही सर्वेक्षणात अद्याप ही बाब निर्दशनास आलेली नाही.

तथापि, केंद्रिय शिक्षा मंत्रालयाच्या स्कूल शिक्षा व साक्षरता विभागाच्या दिनांक १ जुलै २०२५ रोजीच्या पत्रांन्वये असे कळविण्यात आलेले आहे की, खानपानाच्या चुकीच्या पद्धतीमुळे प्रौढांमध्ये तसेच बालकांमध्ये लठ्ठपणाचे प्रमाण वाढलेले आहे. तसेच शाळेच्या परिसरामध्ये सहजतेने उपलब्ध होणारे गोडपदार्थ, साखरयुक्त पेये इत्यादींच्या सेवनामुळे मुलांमध्ये टाईप-२ मधुमेहाचा धोका देखील वाढलेला आहे.
(२), (३) व (४) शाळेच्या परिसरामध्ये सहज उपलब्ध असलेल्या साखरयुक्त पदार्थ, पेये आणि प्रक्रिया केलेले अन्न यांच्या अतिसेवनामुळे मुलांमध्ये वाढत असलेला टाईप-२ मधुमेह रोखण्यासाठी व साखरेच्या अतिसेवनामुळे उद्‌भवणाऱ्या धोक्यांबद्दल विद्यार्थ्यांना शिक्षित करण्यासाठी, "केंद्रिय माध्यमिक शिक्षण मंडळाने (CBSE)" सर्व संलग्न शाळांना "शुगर बोर्ड/फलक" प्रदर्शित करण्याबाबत सूचित केले आहे.

या संदर्भात राज्यांनी देखील आपल्या अखत्यारित असलेल्या सर्व शाळांमध्ये "शुगर बोर्ड/फलक" प्रदर्शित करण्याच्या अनुषंगाने तसेच शालेय विद्यार्थ्यांमध्ये साखरयुक्त पदार्थांच्या अतिसेवनाने उद्‌भवणाऱ्या धोक्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या अनुषंगाने चर्चासत्रे / कार्यशाळा आयोजित करण्याविषयी उचित कार्यवाही करावी याबाबत देखील केंद्रिय शिक्षा मंत्रालयाच्या स्कूल शिक्षा व साक्षरता विभागाच्या दिनांक १ जुलै, २०२५ रोजीच्या पत्रांन्वये राज्यांना सूचित करण्यात आले आहे.

राज्य मंडळ, पुणे यांच्या दिनांक ३० जून, २०२५ रोजीच्या पत्रान्वये, राज्य मंडळाच्या कार्यकक्षेतील शाळांना अतिरेक साखर सेवनाच्या धोक्याबद्दल विद्यार्थ्यांना शिक्षित करण्यासाठी "शुगर बोर्ड" ची स्थापना करण्याबाबत परिपत्रकान्वये कळविण्यात यावे, असे विभागीय मंडळांना सूचित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत पदभरतीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(११) * ९०६० श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत पदभरतीमध्ये गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी करत उमेदवारांनी याबाबत चौकशी वा कारवाईसाठी दिनांक १५ मे, २०२५ रोजी गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी उपोषण पुकारले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) होय

युवा-युवती नोकर भरती संघर्ष कृती समिती, गडचिरोली या संघटनेने दिनांक १५.०५.२०२५ पासून जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालयासमोर साखळी उपोषण करण्याबाबत दिनांक ०६.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते.

(२) व (३) गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पदभरतीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असता, बँकेने मागील सहा वर्षांमध्ये कोणत्याही प्रकारची नोकरभरती प्रक्रिया राबविलेली नाही अथवा त्यासंदर्भात कोणतीही जाहिरात प्रसिध्द केलेली नाही. तथापि मागील काही वर्षात अनधिकृत व बोगस वेबसाईटच्या माध्यमातून काही अज्ञात व्यक्तींकडून तसेच समाज माध्यमातून बँकेच्या नोकर भरती प्रक्रियासंदर्भात खोटी व बनावट माहिती/जाहिरात प्रसिध्द केल्याचे बँकेच्या निदर्शनास आले होते. त्यानुषंगाने बँकेने त्यांच्या अधिकृत वेबसाईटवर तसेच दिनांक १६.०७.२०२१ रोजी हॅलो गडचिरोली व लोकमत या प्रादेशिक वर्तमानपत्रात गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची कोणतीही नोकरभरती प्रक्रिया सुरु नसल्यामुळे अनधिकृत व खोटया वेबसाईट तसेच समाज माध्यमाद्वारे बेकायदेशीररित्या प्रसिध्द करण्यात येत असलेल्या जाहिरातीपासून व फसवेगिरी करणाऱ्या व्यक्तींपासून जनतेने सावध राहावे, अशी जाहिर सूचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आंबा (ता.परतूर) व वाघाळा-टाकळखोपा तळणी, देवठाणा-उस्वद (ता.मंठा) येथील कोल्हापुरी बंधाऱ्याचे रुपांतर उच्च पातळी बंधाऱ्यात करणेबाबत

**(१२) * १०२८० श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परतूर येथील मंठा तालुक्यातील बरबडा आकणी बृहद लघु पाटबंधारे प्रकल्पाचे काम ९० टक्केच्या वर पूर्ण झाले असून केवळ कंदर भरणी करण्याचे काम शिल्लक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत ३० वर्षांपासून धरणाचे काम अपूर्ण असून आकणी गावाचे पुनर्वसन अद्याप करण्यात आले नसून शेतकऱ्यांच्या संपादीत जमिनीचा व घरांचा मोबदला देणे बाकी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच आंबा (ता.परतूर) व वाघाळा-टाकळखोपा तळणी, देवठाणा-उस्वद (ता.मंठा) येथील कोल्हापुरी बंधारे फुटल्याने पाणी वाहून जात असल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा व सिंचनाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लघुपाटंबधारे प्रकल्पाचे काम पूर्ण करणे, शेतकऱ्यांना भूसंपादन मोबदला देणे, आकणी गावाचे पुनर्वसन करणे तसेच सदर कोल्हापूरी बंधाऱ्याचे उच्च पातळी बंधाऱ्यात रुपांतर करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय.
(२) अंशतः खरे आहे.
सदर प्रकल्पाकरीता लागणाऱ्या एकूण जमिनीपैकी २७२.८० हे. जमिनीचे भूसंपादन झालेले असून अंतिम मावेजा वाटप करण्यात आलेला आहे.
आकणी गावाच्या पुर्नवसनाकरीता वाटूर शिवार, तळणी फाटा, मंठा तालुक्याच्या ठिकाणी, केंधळी शिवार अशा वेगवेगळया ठिकाणी शेतकरी मागणी करीत राहिले, परंतु त्यातही सर्व शेतकऱ्यांची एकवाक्यता नसणे व काही शेतकऱ्यांचा विरोध असणे या कारणाने भूसंपादन व पुनर्वसनाची कार्यवाही प्रलंबित आहे.
(३) होय.
(४) आकणी गावाच्या पुनर्वसनाकरीता शेतकऱ्यांचा विरोध असल्यामुळे सदर प्रकल्पाचे बांधकाम या गावाचे पुनर्वसन करून करावे किंवा पुनर्वसन न करता प्रकल्पाची उंची कमी ठेवून बांधकाम करावे. अशा दोन पर्यायांबाबत

क्षेत्रीय स्तरावर तपासणी सुरू आहे. यासंदर्भात सक्षम स्तरावर निर्णय घेऊन प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

सदर को.प. बंधाऱ्याचे रुपांतर बॅरेजमध्ये करण्यासाठी सर्वेक्षणाच्या अंदाजपत्रकास तत्वत: मान्यता मिळण्याकरीता प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून त्याची छाननी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगोली कृषि उत्पन्न बाजार समितीमधील लिलाव शेडमध्ये व्यापाऱ्यांनी अनधिकृतपणे माल ठेवल्याबाबत

**(१३)** * **१०७८० श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये असलेल्या लिलाव शेडमध्ये व्यापा-यांनी मनमानी व अनधिकृतपणे स्वत:चा माल ठेवल्यामुळे शेतक-यांचा शेती माल पावसात भिजत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी जिल्हा उपनिबंधक व बाजार समितीतील संबंधितांना तात्काळ लिलाव शेडमधील व्यापा-यांचा माल उचलण्याच्या सूचना देऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही न झाल्याने शेतकऱ्यांचे नाहक आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देणेबाबत तसेच संबंधित व्यापारी व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आर्वी (जि.वर्धा) येथील सहकारी संस्थेतील गैरव्यवहाराची चौकशी करुन संचालक मंडळ बरखास्त करणेबाबत

**(१४)** * **७२५० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (जि.वर्धा) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्री.संदिप काळे हे तहसील सहकारी कास्तकारी खरेदी-विक्री संस्था आणि शेतकरी जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी लि. चे पदाधिकारी असून ते या सहकार क्षेत्रातील संस्थांमार्फत अवैध आर्थिक लाभ मिळवीत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.संदिप काळे यांच्या सहकार क्षेत्रातील संस्थांमधल्या अवैध आर्थिक लाभामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असून सभासद शेतकरी त्यांच्या हक्कांपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त चौकशीच्या अनुषंगाने सदर संचालक मंडळ बरखास्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय हे खरे आहे.

सदर तक्रार दि.१३.०४.२०२५ व दि.२५.०४.२०२५ रोजी प्राप्त झाली आहे.

(२), (३) व (४) प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन), अधिनियम, १९६३ व त्याखालील नियम १९६७ मधील तरतूदीनुसार सहायक निबंधक व लेखापरिक्षक वर्ग-१ यांची दि.२१.०४.२०२५ रोजी चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. त्यानुसार चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनाचे लाभ देण्याबाबत

**(१५) * ७९४३ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील बेंबळा, अरुणावती, निम्न पैनगंगा, अडाण अशा विविध प्रकल्पांमुळे १४१ गावातील हजारो कुटुंबे विस्थापित झाली असून या बाधित कुटुंबांना शासकीय नियमांनुसार पुनर्वसनाचे लाभ देणे बंधनकारक असतांना प्रशासनाने आजवर १६,१६५ प्रकल्पग्रस्तांना तसे प्रमाणपत्रही दिले, आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापैकी केवळ ६९८ जणांनाच शासकीय नोकरीत सामावून घेतल्याची नोंद अहवालात असून तब्बल १५ हजारांहून अधिक प्रमाणपत्रधारक कुटुंबे अजूनही नोकरीच्या आणि पर्यायाने स्थिर पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत असल्याचे दिनांक १० एप्रिल, २०२५ रोजी निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालात पुनर्वसनासाठी किती जमीन किंवा भूखंड प्रत्यक्षात वाटप केले याचीही एकत्रित माहिती देण्यात आली नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनाचे लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. २७/१०/२००९ नुसार प्रकल्पग्रस्तांच्या नेमणूका जाहीरात देवून संबंधीत पदांच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारांची पात्रता तपासून स्पर्धा परिक्षेद्वारे गुणवत्तेनुसार करण्यात येतात.
तसेच सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दि.२७/०८/२००९ अन्वये प्रकल्पग्रस्तांना शासकीय व निमशासकीय सेवांमध्ये नियुक्त्या देण्यासाठी एकूण संवर्ग बळाच्या ५ टक्के समांतर आरक्षण देण्यात आलेले आहे. त्यानुसार बेंबळा, अरुणावती व अडाण प्रकल्पातील पात्र ठरणाऱ्या अनुक्रमे २१,२१८ व २३ प्रकल्पग्रस्त व्यक्तिंना नेमणूका देण्यात आल्या आहेत.
(३) अमरावती विभागातील उक्त प्रकल्पांतर्गत खालील प्रमाणे भूखंड वाटप करण्यात आले असून कुठल्याही प्रकारची जमीन वाटप करण्यात आलेली नाही.
अमरावती- जिल्ह्यातील बेंबळा प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांना २३०४ भूखंड वाटप करण्यात आले आहे.
यवतमाळ- जिल्ह्यामध्ये बेंबळा-४८३२,
अरुणावती-१९८४, निम्न पैनगंगा-० व अडाण-० भूखंड वाटप करण्यात आले आहे.
वाशिम- जिल्ह्यातील बेंबळा प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांना ८८० भूखंड वाटप करण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील एलकुंदे येथील प्रेसिडेन्सी इंग्लिश स्कूल या शाळेमध्ये आरटीई अंतर्गत प्रवेश नाकारल्याबाबत

**(१६) * ११८५७ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील एलकुंदे येथील प्रेसिडेन्सी इंग्लिश स्कूल या शाळेमध्ये सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षाकरिता आर.टी.ई. अंतर्गत २५ टक्के प्रवेशित बालकांचा लॉटरी प्रक्रियेतून इयत्ता १ ली साठी प्रवेश निश्चित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुका पडताळणी समितीकडून प्रवेश निश्चित करण्यात आले असतानाही सदर शाळेमार्फत लॉटरीत प्रथम फेरीत निवड झालेल्या १९ बालकांना प्रवेश नाकारण्यात आला असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन नियमांचे उल्लंघन करून पात्र बालकांना प्रवेश नाकारणाऱ्या संबंधित शाळेविरुद्ध शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) संबंधित शाळेमध्ये एकूण २५ विद्यार्थी आरटीई अंतर्गत प्रवेशासाठी पात्र झालेली आहेत. यापैकी २१ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले असून उर्वरित ४ विद्यार्थ्यांपैकी ३ विद्यार्थ्यांच्या पालकांनी शाळेस संपर्क केला नाही, तसेच एका विद्यार्थ्यांचा प्रवेशावेळी काही इसमांनी शाळेत गैरवर्तणूक केल्याने शाळेने सदर इसमांविरूद्ध पोलीस ठाणे, भिवंडी येथे नोंदणी क्र. ५६८/२०२५ अन्वये अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे. तथापि, विद्यार्थ्यांच्या पालकांशी संपर्क करून ४ विद्यार्थ्यांना तात्काळ प्रवेश देण्याबाबत शाळेला निर्देश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भातील सिंचन प्रकल्प अपूर्ण असल्याबाबत

**(१७) * ८१४४ श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील सिंचन क्षमतेत वाढ करण्याकरिता मान्यता दिलेल्या १२७ प्रकल्पांपैकी सुमारे ६५ प्रकल्प अपूर्णावस्थेत असून १७ प्रकल्प रद्द करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत अनेक वर्षांपासून प्रकल्पांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देणे, अतिरिक्त निधी खर्च करुनही केवळ ३९ टक्के सिंचन क्षमता निर्माण झाली असून सिंचनाचा अनुशेष कायम असल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे मोठया प्रमाणावर नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित विभागामार्फत सदर प्रकल्पांवर करण्यात आलेला खर्च, कामाचा कालावधी, वाढलेली सिंचन क्षमता याबाबतची अद्ययावत श्वेतपत्रिका निर्गमित करण्याची मागणी वारंवार लोकप्रतिनिधींनी करुनही अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन विदर्भातील अपूर्ण प्रकल्प तातडीने पूर्ण करुन सिंचनाचा अनुशेष पूर्ण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, अंशत: खरे आहे.

महामंडळांतर्गत माहे जून, २०२४ अखेर एकूण ८५८ सिंचन प्रकल्पांपैकी ७५८ सिंचन प्रकल्प पूर्ण झालेले आहेत. उर्वरित १०० सिंचन प्रकल्पांपैकी १३ प्रकल्पांना वनजमिन मान्यता व इतर कारणाने त्यांची प्रशासकीय मान्यता व्यपगत झाली असल्याने या प्रकल्पांची कामे सुरु होऊ शकली नाहीत. त्यामुळे सद्यःस्थितीत ८७ सिंचन प्रकल्प प्रगतीपथावर आहेत.

विदर्भातील सर्व प्रकल्पांची अंतिम सिंचन क्षमता २२.३१ लक्ष हे. इतकी असून, माहे जून, २०२४ अखेर पूर्ण व बांधकामाधीन प्रकल्पांवर सुमारे १४.२३ लक्ष हे. (६४%) इतकी सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली आहे.
(२) होय, अंशत: खरे आहे.

सद्यःस्थितीत ८७ सिंचन प्रकल्प प्रगतीपथावर असून, त्यापैकी १२ प्रकल्प वनजमिन व इतर कारणांनी त्यांची कामे प्रलंबित आहेत. या ८७ प्रकल्पांची अंतिम सिंचन क्षमता १२.६० लक्ष हे. इतकी असून माहे जून, २०२४ अखेर ४.८१ लक्ष हे. इतकी सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

निर्देशांक व अनुशेष समितीने माहे जून, १९९४ अखेर विदर्भातील ६ जिल्ह्यांत सिंचनाचा अनुशेष ७,८४,७२० हे. इतका होता. त्यापैकी माहे जून, २०२५ अखेर ७,४१,१८५ हे. इतका अनुशेष (९४%) दूर झाला असून ४३,५३५ हे. इतका अनुशेष अकोला व बुलढाणा या दोन जिल्ह्यांत शिल्लक आहे.
(३) नाही, श्वेतपत्रिका निर्गमित करण्याचे प्रयोजन नाही.
(४) विदर्भातील अपूर्ण सिंचन प्रकल्पांना केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, बळीराजा जलसंजीवनी योजना, नाबार्ड (RIDF) अंतर्गत विविध मालिका, नाबार्ड (NIDA) अंतर्गत कर्ज सहाय्य व शासन अंशदान इ.विविध स्त्रोतातून निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

राज्याच्या अर्थोपायाच्या स्थितीनुसार व मा.राज्यपाल महोदयांच्या निदेशातील निधी वाटपाच्या सूत्रानुसार सिंचन प्रकल्पांना निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.
अमरावती विभागातील सिंचन अनुशेष असलेल्या प्रकल्पांकरीता तसेच नागपूर प्रदेशातील गोसिखुर्द राष्ट्रीय प्रकल्पाकरीता अतिरिक्त निधी मा. राज्यपाल यांचे निर्देशाबाहेर ठेवून उपलब्ध करून देण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात पवित्र पोर्टलच्या माध्यमातून निवड झालेल्या शिक्षक उमेदवारांना नियुक्त्या देण्याबाबत

**(१८) * ८९०२ श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शाळांमध्ये शिक्षक भरतीसाठी "पवित्र पोर्टल" च्या माध्यमातून सन २०२२ मध्ये शिफारस करण्यात आलेल्या ८०१ शिक्षकांना १४ महिन्यांपासून नियुक्ती न दिल्याचे दिनांक १४ एप्रिल, २०२५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नियुक्त्या प्रलंबित असल्यामुळे संबंधित उमेदवार व त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली असून त्यांनी आझाद मैदान, मुंबई येथे धरणे आंदोलन सुरु केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, "पवित्र पोर्टल" वरील निवड यादीत उच्च गुण मिळवूनही नियुक्त्या न मिळाल्याने, शासनाच्या निकषांनुसार त्यांना रुपांतरीत फेरीत समाविष्ट करून नियुक्त्या द्याव्यात, अशी संबंधित उमेदवारांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नियुक्त्या न दिलेल्या ८०१ शिक्षक उमेदवारांना तात्काळ नियुक्त्या देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) मा.उच्च न्यायालयाच्या स्थगिती आदेशामुळे या उमेदवारांना नियुक्ती देता आली नाही. यापैकी काही उमेदवारांनी लवकर नियुक्ती देण्याबाबत धरणे आंदोलन मार्गाचा अवलंब केला होता. काही उमेदवारांनी रयत शिक्षण संस्थेऐवजी अन्य संस्थेत नियुक्ती देण्याची मागणी केली होती.
(४) दि.२१.०४.२०२५ रोजी या उमेदवारांना नियुक्ती देण्यावरील स्थगिती मा.उच्च न्यायालयाने उठविल्यानंतर ७४८ उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही रयत शिक्षण संस्थेमार्फत करण्यात आली आहे. उर्वरित ५३ उमेदवारांना अन्य संस्थेत नियुक्ती देण्याबाबत आयुक्त (शिक्षण) यांना सूचित केल्यानुसार आवश्यक कार्यवाही त्यांच्यामार्फत करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर शहरातील आयटीआय मध्ये शिकणाऱ्या मुलींचे वसतिगृह निधीअभावी अपूर्ण असल्याबाबत

**(१९) * ९१७७ श्री.देवेंद्र कोठे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरात सन २०११ मध्ये आयटीआय मध्ये शिकणाऱ्या ५० मुलींसाठी मंजूर करण्यात आलेल्या वसतिगृहाचे बांधकाम निधीअभावी बंद असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अपूर्ण बांधकामामुळे बंद असलेल्या वसतिगृहात जुगार, दारू आणि अवैध व्यवसाय सुरू आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त वसतिगृहाचे काम निधीच्या उपलब्धतेसह सत्वर पूर्ण करणेबाबत तसेच त्याठिकाणी अवैध व्यवसाय करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
महिला वसतिगृह इमारतीच्या आवारांत बाहेरील लोकांचा वावर वाढलेला असून त्यामध्ये अवैध धंदे चालतात याबाबत स्थानिक वृतमानपत्रात बातम्या प्रसारित झाल्या. वसतिगृहाचे बांधकाम अपूर्ण असल्यामुळे वसतिगृहाचा ताबा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस मिळाला नाही. त्यामुळे प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सोलापूर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागास वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण करुन ती संस्थेच्या ताब्यात देईपर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून एक पहारेकरी ठेवण्यात यावा, असे कळविण्यात आले. त्याबाबत उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग, (उत्तर) यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सदर बाझार, पोलीस ठाणे, सोलापूर यांना पत्रव्यहार केलेला आहे. सदर पोलीस ठाणे पोलिसांकडून सद्य:परिस्थितीत

दररोज पेट्रोलिंग व गस्त घालण्यात येत आहे. परंतु, आजतागायत पोलीस यंत्रणेस कोणतेही अवैद्य धंदे करणारे इसम आढळून आलेले नाहीत.
(३) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सोलापूर (मु) या संस्थेत मुलींसाठी वसतिगृह बांधकाम करण्याबाबत दि. १२ जून, २००८ रोजीच्या शासन निर्णयाअन्वये रु.५१,०९,२४८/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सदर मान्यतेअन्वये मंजुर निधी पूर्णपणे खर्च झालेला आहे. तथापि, दरसुचीतील वाढीमुळे व इतर वाढीव बांधकामावरील खर्चामध्ये वाढ झाली आहे. सदर वाढीव खर्च रु.११९.५७ लक्ष इतक्या किंमतीचे अंदाजपत्रकास जिल्हा नियोजन समितीकडून मान्यता देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
तसेच त्याठिकाणी अवैध व्यवसाय सुरु नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) लागू नाही.

-----------------

## मांजरा प्रकल्पाचा उजवा कालवा फुटल्याने पाण्यासह शेतीचे नुकसान झाल्याबाबत

**(२०) * ७३२६ श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यातील मांजरा सामनगांव जलसेतू जवळ कालवा फुटल्याने अंदाजे ०.१५ दशलक्ष घनमीटर पाणी वाया जाऊन शेतीचे नुकसान झाल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याच ठिकाणी ३ वर्षांपूर्वीही कालवा फुटल्याने मोठया प्रमाणात पाण्याचा अपव्यय आणि शेतीचे नुकसान झाले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देणेसह सर्व कालव्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
मांजरा प्रकल्पाचा उजवा कालवा उन्हाळी हंगामातील तिसऱ्या आवर्तनादरम्यान दि. १६.०५.२०२५ रोजी साखळी क्र. ६०४५० मी. येथे फुटला होता. साखळी क्र. ५७७४० वरील Cross Regulator च्या पुढे फुटलेला कालवा भागापर्यंत असलेले ०.००९ द.ल.घ.मी पाणी वाहून नदीवरील असलेल्या बंधाऱ्यात साठले गेले होते. सदर पाणी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी सिंचनासाठी वापरले आहे. त्यामुळे पाण्याचा अपव्यय होऊन शेतीचे नुकसान झाल्याचे आढळून आले नाही.
(२) अंशत: खरे आहे.
सन २०२३ मध्ये उन्हाळी सिंचनादरम्यान यावर्षी ज्या ठिकाणी कालवा फुटला होता त्याच ठिकाणी कालवा फुटला होता. तथापि सदर फुटलेल्या कालव्याचे पाणी नाल्यात वाहून गेल्यामूळे शेतीचे नुकसान झालेले नव्हते.
(३) कालवा फुटीमुळे नुकसान झाल्याचे आढळून आले नाही.
सदर क्षतिग्रस्त कालव्याची तातडीने दुरूस्ती पूर्ण करून कालव्याच्या शेवट भागात सिंचन करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी नवीन शिष्यवृत्ती योजना सुरु करणेबाबत

**(२१) * ९८६९ श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणारी प्री मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना बंद करण्यात आलेली असल्याने विद्यार्थ्यांची शाळा गळती वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर, सामाजिक न्याय विभागाच्या सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीच्या धर्तीवर 'फातिमा शेख शिष्यवृत्ती' योजनेबाबत मा. उपमुख्यमंत्री यांना माहे एप्रिल, २०२५ मध्ये निवेदन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या अल्पसंख्याक विभागामार्फत बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केवळ रु.५,००० इतकी शिष्यवृत्ती देण्यात येते. मात्र, बी.एम.एस., बी.एस.सी. (आय.टी.), बी.एस.सी. मायक्रोबायोलॉजी इत्यादी अभ्यासक्रमांसाठी कोणतेही अनुदान उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्यासाठी शिष्यवृत्तीची रक्कम वाढवून रु. ३५,००० ते ४०,००० इतकी करण्याबाबत व नवीन शिष्यवृत्ती योजना सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, शिष्यवृत्ती रकमेतील वाढ व नवीन योजना सुरु करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) असे कोणतेही निवेदन अल्पसंख्याक विकास विभागास प्राप्त झाले नाही.

तसेच राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणारी प्री-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना ही सन २०२२-२३ साठी केंद्र शासनाचे दिनांक २९/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये, सदरची प्री-मॅट्रिक शिष्यवृत्ती ही इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वी मधील विद्यार्थी वगळून फक्त इयत्ता ९ वी ते इयत्ता १० वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

विभागाच्या "उच्च व्यावसायिक व इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरीता, शिष्यवृत्ती योजना भाग -१ व भाग -२ अशा स्वरूपात राबविण्यात येते. सदर योजनेच्या भाग-१ अंतर्गत, संचालक, उच्च व तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत बी. एम. एस. या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून प्रत्यक्ष शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क किंवा रुपये ५०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम शिष्यवृत्ती म्हणून पात्र विद्यार्थ्यांना अदा करण्यात येते. तसेच सदर योजनेच्या भाग-२ अंतर्गत, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्यामार्फत इयत्ता बारावी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या उदाहरणार्थ कला, वाणिज्य आणि विज्ञान पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच सदर प्रश्नांकित अभ्यासक्रम बी.एस.सी.(आयटी), बी.एस.सी. मायक्रोबायोलॉजी इत्यादी अभ्यासक्रमांसाठी सर्व पात्र विद्यार्थ्यांना त्यांचे वार्षिक शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क यांची एकित्रत रक्कम किंवा रुपये ५,०००/- यापैकी जी कमी रक्कम असेल तेवढी रक्कम देण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील सिना नदीवर मौजे तरटगाव, पोटेगाव व संगोबा येथील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांवर स्वयंचलित दरवाजे व संरक्षक कठडे बसविण्याबाबत

**(२२) * १२९२८ श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील सिना नदीवर मौजे तरटगाव, पोटेगाव व संगोबा येथील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-याचे दरवाजे जुने व जीर्ण झालेले असून धरणातून पाणी गळती होत असल्याने पाण्याचा साठा होत नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर तिन्ही बंधाऱ्यांवर पुलाचे बांधकाम झाले असल्यामुळे परिसरातील २० ते २५ गावांचे दळणवळण सदर पुलावरुन होत असून पुलावरील संरक्षक कठडे (बॅरिकेड्स) खराब झाली असल्याने अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यावर स्वयंचलित दरवाजे बसविणे व बंधा-यावरील पुलावर संरक्षक कठडे (बॅरिकेड्स) बसविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जलसंपदा मंत्री यांचेकडे दिनांक २१ मे, २०२५ रोजी लेखी निवेदनाद्वारे केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत जुने व जिर्ण बर्गे दुरूस्तीकरून तरटगाव, पोटेगाव व संगोबा या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांमध्ये बहुतांश पाणीसाठा करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय,

याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.२१ मे, ०२५ रोजीच्या निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

(४) तरटगाव, पोटेगाव व संगोबा या को.प. बंधाऱ्यांवर सद्यस्थितीत लोखंडी बर्ग्यांच्या माध्यमातून पाणीसाठा नियंत्रित केला जात असून स्वयंचलित दरवाजे बसविणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नाही.

तरटगाव, पोटेगाव व संगोबा या को.प. बंधाऱ्यांसाठी आवश्यक नवीन लोखंडी बर्ग्यांची मागणी सन २०२५-२६ च्या बिगर सिंचन प्रापणसूचीमध्ये करण्यात येत आहे. संगोबा बंधाऱ्यावरील संरक्षक कठडे सुस्थितीत आहेत. पोटेगाव बंधाऱ्यावरील संरक्षक कठडयाचे काम ऑगस्ट, २०२४ मध्ये प्रशासकीय मान्यता प्राप्त विशेष दुरूस्ती कामामध्ये असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत. तरटगाव बंधाऱ्यावर संरक्षक कठडे नसल्याने सन २०२५-२६ च्या प्रापणसूचीमध्ये संरक्षक कठडे नव्याने बांधण्याच्या कामाचा समावेश करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालेगाव (जि. नाशिक) तालुक्यातील जमहुर हायस्कूल ॲण्ड ज्यु. कॉलेज येथील शिक्षक भरती प्रक्रियेतील अनियमिततेबाबत

**(२३) * १२७९१ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि. नाशिक) तालुक्यातील अंजुमन तालीम ए-जमहुर संस्था संचलित जमहुर हायस्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेजमध्ये सन २०१६ ते २०२४-२०२५ या कालावधीत संस्थाचालकांच्या बनावट सह्यांद्वारे एकूण १३ शिक्षकांच्या बोगस नियुक्त्या करण्यात आल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची माहिती स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ मे, २०२५ रोजी शालेय शिक्षण मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार मंत्री महोदयांनी प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांना तात्काळ चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर निर्देशानुसार संबंधित शाळेतील शिक्षक भरती प्रक्रियेतील अनियमिततेबाबत सखोल चौकशी करण्यात आली असून, चौकशी अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, अहवालात दोषी आढळून आलेल्या संस्थाचालकांवर व बोगसरित्या भरती करण्यात आलेल्या शिक्षकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) दि. ०४ जून, २०२५ रोजीच्या पत्रान्वये मा. शालेय शिक्षण मंत्री महोदयांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) तक्रार अर्जात नमूद विविध मुद्द्यांच्या अनुषंगाने चौकशी करून अहवाल सादर करण्याच्या सुचना शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना देण्यात आल्या आहेत. चौकशी अंती समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## राज्यात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थ्यांना प्रलंबित विद्यावेतन अदा करणेबाबत

**(२४) * ११८९० श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील युवकांना प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची नोकरी मिळविण्याची क्षमता वाढविण्यासाठी दिनांक ९ जुलै, २०२४ रोजी पासून 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' राबविण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेतील सहभागी उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे प्रतिमहा विद्यावेतन मिळत असून माहे मार्च, २०२५ पासून सदर उमेदवारांचे विद्यावेतन प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ही योजना पुढे सुरू ठेवण्यात यावी, त्याचा कालावधी वाढवावा, प्रशिक्षणार्थींना कायमस्वरूपी रोजगार देण्यात यावा, तसेच सर्वांना विम्याचे कवच देण्यात यावे या प्रमुख मागण्यांचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी (मोर्शी-वरूड) तहसिलदार, वरूड यांना दिले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रशिक्षणार्थी उमेदवारांचे विद्यावेतन प्रलंबित असून त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना पुढे सुरु ठेवण्यात यावी, योजनेंतर्गत प्रशिक्षण कालावधी वाढवावा, प्रशिक्षणार्थ्यांना कायमस्वरुपी रोजगार उपलब्ध व्हावा, प्रशिक्षणार्थ्यांना विमा कवच उपलब्ध व्हावे इत्यादी मागण्यांबाबत विविध लोकप्रतिनिधींकडून निवेदने प्राप्त झाली आहेत.

दि. ०२.०७.२०२५ अखेर योजनेंतर्गत १.२३ लक्ष प्रशिक्षणार्थ्यांना त्यांना अनुज्ञेय असलेले विद्यावेतन अदा करण्यात आले असून १६ हजार प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत कार्यप्रशिक्षणाचा कालावधी ६ महिन्यांऐवजी ११ महिने करण्यात आला आहे.

सदर योजनेंतर्गत पात्र उमेदवारांना शासकीय /निमशासकीय /खाजगी आस्थापनांत कार्यप्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर बाब ही नियुक्ती नसून केवळ प्रशिक्षणाची संधी आहे. या योजनेंतर्गत विद्यमान प्रशिक्षणार्थ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या जागी नवीन प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात येते.

योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थ्यांना सुयोग्य विमाछत्र प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

सर्व प्रशिक्षणार्थ्यांना विहीत कालावधीत विद्यावेतन अदा करण्याकरीता प्रशिक्षणार्थ्यांच्या बँक खात्याच्या अचूक तपशीलासह त्यांची उपस्थिती शासनाने विहीत केलेल्या पोर्टलवर वेळेवर नोंदविण्याबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहे.

-----------------

## राज्यातील शाळांमध्ये प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत मध्यान्ह भोजनासाठी तांदूळ व इतर साहित्याच्या पुरवठयात तुटवडा आल्याबाबत

**(२५) * ८३७८ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: गोंदिया, लातूर, धाराशिव, चंद्रपूर, मुंबई यांसह विविध जिल्ह्यांमध्ये 'प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत' विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या मध्यान्ह भोजनात तांदूळ, डाळ, तेल आदी पोषण साहित्याचा तुटवडा, अपुरा वा निकृष्ट दर्जाचा पुरवठा आणि वितरणात अनियमितता असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कंत्राटदार संस्था अथवा संबंधित व्यक्ती तसेच संबंधित मुख्याध्यापकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत लातूर, धाराशिव, चंद्रपूर, मुंबई या जिल्ह्यांमध्ये तांदूळ व धान्यादी मालाबाबत सदरप्रमाणे बाब निदर्शनास आलेली नाही.

गोंदिया जिल्ह्यामध्ये माहे डिसेंबर, २०२५ अखेरीस शाळा स्तरावरील शिल्लक तांदूळ साठा विचारात घेवून माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०२५ महिन्यांसाठी तांदूळ मंजूर करण्यात आला होता. तथापि, शाळा स्तरावरील

शिल्लक तांदूळ व कार्यदिन याची परिगणना व्यवस्थित न झाल्याने माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये अर्जुनी मोरगाव व तिरोडा तालुक्यातील २६ शाळांमध्ये तांदूळ तुटवडा निर्माण झाला होता. प्रस्तुत कालावधीत सदर २६ शाळांनी उसनवारी तत्त्वावर तांदूळ घेवून विद्यार्थ्यांना पोषण आहाराचा लाभ दिलेला आहे. तसेच, प्रस्तुत २६ शाळांच्या मुख्याध्यापकांना कारणे दाखवा नोटीस देण्याबाबत संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खडकवासला धरण क्षेत्रातील अतिक्रमण निष्कासित करणेबाबत**

**(२६) * ७५०२ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गोऱ्हे खुर्द, खानापूर, गोऱ्हे बुद्रुक आदी गावांमध्ये मोठया प्रमाणावर भराव टाकून अतिक्रमण केल्यामुळे धरणाच्या पाणीसाठयावर विपरीत परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खडकवासला धरण क्षेत्रात जलसंपदा विभागाने अतिक्रमण करणाऱ्यांना नोटिस बजावून कारवाई करण्याचा प्रयत्न केला असता स्थानिक पोलीस प्रशासनही सहकार्य करत नसल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धरण क्षेत्रातील काही अतिक्रमणकर्त्यांकडून जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना धमक्या दिल्याच्या घटना घडत असून अशा प्रकरणांमध्ये संबंधितांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खडकवासला परिसरातील सरकारी वहिवाटीचे रस्ते, आणीबाणीच्या प्रसंगी वापरण्यात येणारे प्रवेशमार्ग, अतिक्रमणामुळे बंद झाल्यामुळे आपत्कालीन व्यवस्थापनात अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जलसंपदा विभागाच्या मालकीची संपादीत जमीन काही स्वयंसेवी संस्था व नागरिकांच्या सहकार्याने सुशोभित केली गेली, तथापि, सध्या त्याच जागांवर बेकायदेशीर बंगले, फार्म हाऊसेस, हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि खासगी कंपन्या उभारण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, खडकवासला धरण क्षेत्रातील वाढते अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

खडकवासला धरणाच्या पाण्याखालील क्षेत्रात अतिक्रमण झाले नसल्याने धरणाच्या पाणीसाठयावर परिणाम झालेला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) होय, हे खरे आहे.

(६) खडकवासला धरण जलाशयाच्या बाजूने असणा-या अतिक्रमण धारकांना रितसर नोटीसा देण्यात आलेल्या असून त्याअनुषंगाने अतिक्रमणे निष्कासित करण्याची कार्यवाही जलसंपदा विभाग (स्थापत्य व यांत्रिकी विभाग), पुणे महानगरपालिका, महसूल विभाग तसेच गृह विभाग यांच्या सहकार्याने करण्यात येते.

-----------------

## वाशिम जिल्ह्यातील सोनल प्रकल्पाचे गेट दुरुस्त करुन पाणी पुरवठा करणेबाबत

**(२७) * ११२४६ श्री.श्याम खोडे (वाशिम) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील शेलूबाजार परिसरातील सुमारे ५० गावांमध्ये भीषण पाणी टंचाई निर्माण झाल्याने सोनल प्रकल्पाचे गेट दुरुस्त करून पाणी सोडण्याची मागणी येथील नागरिकांनी केल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोनल प्रकल्पाचे गेट मागील काही दिवसांपासून तांत्रिक बिघाडामुळे बंद झाल्याने व या गेटची दुरुस्ती न झाल्याने नागरिक, पशुपक्षी आणि शेती व्यवसाय अडचणीत सापडलेला असतानाच एक नीलगाय पाण्याअभावी मृत्युमुखी पडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सोनल प्रकल्पाच्या गेटची दुरुस्ती करुन शेलू परिसरातील ५० गावांमध्ये सुरळीत पाणीपुरवठा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

दि.१५.०४.२०२५ रोजी च्या पत्रान्वये प्राप्त मागणीनुसार सोनल मध्यम प्रकल्पातून शेलू बाजार परिसरातील पाणी टंचाईवर मात करण्याच्या दृष्टीने दि.२४.०४.२०२५ रोजी पाणी सोडण्यात आले होते. परंतु त्या दरम्यान मुख्य विमोचकाच्या द्वारात तांत्रिक बिघाड झाल्याने पाणी बंद करावे लागले.

तद्नंतर सोनल प्रकल्पाचे गेट दुरुस्त करुन पाणी सोडणेबाबतची मागणी दि.०७.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये विभागीय कार्यालयास प्राप्त झाली आहे.

(२) पाण्याअभावी नीलगाय मृत्युमुखी पडल्याचा उल्लेख दि.०७.०५.२०२५ रोजीच्या पत्रामध्ये आहे. तथापि वन विभागात चौकशी केली असता नीलगाय पाणी दुष्काळामुळे मृत्युमुखी पडली नसून तिचा अपघाती मृत्यू झाला असल्याचे सांगण्यात आलेले आहे.

(३) सोनल मध्यम प्रकल्पाच्या मुख्य विमोचकाची द्वार दुरुस्ती करुन दि.१५.०५.२०२५ रोजी पाणी सोडण्यास जिल्हाधिकारी, वाशिम यांनी परवानगी दिली व प्रत्यक्षात दि.१५.०५.२०२५ रोजी पाणी सोडण्यात आले.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत कार्यरत स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या मानधनात वाढ करणेबाबत

**(२८) * १०६७६ श्री.बाबुराव कदम-कोहळीकर (हदगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्यातील सुमारे १ लाख ७५ हजार स्वयंपाकी व मदतनीस गेल्या २० ते २५ वर्षांपासून शाळांमध्ये पोषण आहार तयार करणे, शाळा स्वच्छ ठेवणे, विद्यार्थ्यांना जेवण देणे, भांडी धुणे, शौचालये स्वच्छ ठेवणे आदी जबाबदाऱ्या पार पाडत असूनही त्यांना केवळ रुपये २५००/- इतके तुटपुंजे मानधन मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत पाँडेचेरी राज्यात रुपये १४,०००/-, केरळमध्ये रुपये १०,०००/- व तामिळनाडूमध्ये रुपये ७८००/- दरमहा मानधन दिले जाते, त्यामुळे राज्यातील स्वयंपाकी व मदतनीस यांच्या मानधनात वाढ करण्याची मागणी कर्मचाऱ्यांकडून शासनाकडे लेखी स्वरूपात करण्यात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मानधनवाढीच्या मागणीसंदर्भात काही लोकप्रतिनिधींनी शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली असल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, स्वयंपाकी व मदतनीस यांच्या मानधनात वाढ करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत १,६४,५५८ स्वयंपाकी तथा मदतनीस कार्यरत आहेत. सदर स्वयंपाकी तथा मदतनीस यांना वर्षातील १० महिन्यांकरीता रु.२५००/- प्रतिमाह मानधन देण्यात येते. सदर मानधनामध्ये केंद्र हिस्सा रु.६००/- व समप्रमाण राज्य हिस्सा रु.४००/- आहे. तथापि, राज्य हिस्स्यातून अतिरिक्त रु.१५००/- मानधन देण्यात येत आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) योजनेंतर्गत कार्यरत असणाऱ्या स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या मानधनातील केंद्र हिस्सा वाढविण्याची विनंती केंद्र शासनास केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वडझिरे (ता. पारनेर, जि.अहमदनगर) येथील अश्वमेघ ग्रामीण विगर शेती सहकारी पतसंस्थेतील गैरव्यवहाराबाबत

**(२९) * ११५६१ श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडझिरे (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथील अश्वमेघ ग्रामीण विगर शेती सहकारी पतसंस्थेचे माजी अध्यक्ष, उपाध्यक्ष व रोखपाल हे सन २०१४ साली केलेल्या आर्थिक गैरव्यवहारासंदर्भात महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये केलेल्या फेर तपासणीत दोषी आढळून आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संबंधित दोषींविरुद्ध शासनाने अद्याप कोणतीच कारवाई न करता प्रकरण दडपल्याचा प्रकार नुकताच दिनांक २२ मे, २०२५ रोजी निदर्शनास आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणात सन २००४ मध्ये सदस्य असलेल्या परंतु, या प्रकरणाशी कोणताही संबंध नसलेल्या श्रीमती यमुनाबाई नवले व त्यांचे स्वर्गीय पती कै. चंद्रराव नवले यांचेसह १६ निरपराध संचालकांविरुद्ध कलम ९८ अन्वये वसूली अधिकाऱ्यांनी शहानिशा न करता दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० रोजी सक्तीचा वसूली हुकुमनामा जारी केला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन निर्दोष संचालकांना कारवाईतून वगळण्यासह संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :**
(१) होय, अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी कलम ८८ अंतर्गत केलेल्या फेरतपासणीत पतसंस्थेचे माजी अध्यक्ष, तत्कालिन व्यवस्थापक व तत्कालिन रोखपाल यांना दोषी धरण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांनी सदर प्रकरणी नियम ७२(५) अन्वये नव्याने चौकशीचे आदेश दि.२६/०६/२०२३ रोजी दिले. त्याप्रमाणे प्राधिकृत अधिकारी यांनी नियम ७२(५) अन्वये चौकशी करून दि.२४/१२/२०२४ रोजी चौकशी अहवाल दाखल केला. त्यास अनुसरून दि.१७/०२/२०२५ रोजी सहायक निबंधक, सहकारी संस्था, पारनेर, जि.अहमदनगर यांनी कलम ९८ चे प्रमाणपत्र जारी केले असून त्यामध्ये श्रीम.यमुनाबाई चंद्रराव नवले व कै.चंद्रराव बाबूराव नवले यांच्यासह १६ संचालकांचा समावेश नाही.

(४) लागू नाही.

(५) लागू नाही.

-----------------

**सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., बाज (ता.जत, जि.सांगली) शाखेत निधीचा अपहार झाल्याबाबत**

**(३०)* १२३८४ श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बाज (ता.जत, जि.सांगली) शाखेत शासनाकडून शेतकऱ्यांसाठी आलेल्या अनुदानातील सुमारे ५० लाख रुपये तत्कालिन शाखा अधिकारी व लिपिक यांनी बँकेच्या खात्यावरुन स्वत:च्या आणि इतर नातेवाईकांच्या नावे टाकून निधीचा अपहार केल्याची घटना माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी निधीचा अपहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निधीचा अपहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) होय.

(२) नाही.

(३) सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली, शाखा बाज, ता.जत मध्ये रु. ३१.८६ लाख रुपयाचा अपहार झाल्याचे दिनांक २९.०५.२०२५ रोजी निदर्शनास आले. त्यानुषंगाने सदर अपहार प्रकरणाची चौकशी विशेष लेखापरिक्षक वर्ग-२, अधिन जिल्हा लेखा परिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, सांगली यांनी केली व सदर चौकशीचा अंतरिम अहवाल दिनांक २०.०६.२०२५ रोजी सादर केला आहे. सदर अहवालामध्ये त्यांनी रु. ३२.०८ लाख इतक्या रकमेचा अपहार झाल्याचे नमूद केले आहे. सदर अपहारा प्रकरणी दोषी असलेले श्री. संदिप महादेव सोलनकर, श्री. जयाजी पांडूरंग शिंदे व कोंडीबा महादेव खरात यांना सेवेतून निलंबित केले असून त्यांच्या विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. या दोषी कर्मचाऱ्यांविरुध्द आरोपपत्र दाखल झाल्यानंतर त्यांची विभागीय चौकशी करुन पुढील प्रशासकीय कारवाई करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला मिळणेबाबत**

**(३१) * ७९४७ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाला मदत व्हावी व शेतशिवार सिंचनाने जलसमृध्द व्हावे, यासाठी अमरावती जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांनी स्वत:ची ७.२९१ हेक्टर जमीन सरळ खरेदी पद्धतीने अतिशय अल्प मोबदल्यात शासनास दिली असून त्यांना त्यासाठी पाच लाख रुपये प्रतिहेक्टर सानुग्रह अनुदान दिले जाणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुख्यमंत्र्यांच्या हस्ते त्या वितरणाला सुरुवात करण्यात आल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०२५ रोजी निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जेलरोड स्थित अमरावती प्रकल्प बांधकाम विभाग क्रमांक १ या कार्यालयात तसा अर्ज नमुना लावण्यात आला आहे, तसेच १२ प्रकारची वेगवेगळी दस्तऐवजे जोडण्याचेही बंधनकारक करुन त्यांना नैसर्गिक न्यायापासून वंचित ठेवण्यात आल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना त्यांच्या जमीनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्ह्यातील ७२९१ हेक्टर जमीन सिंचन प्रकल्पासाठी सरळ खरेदीने संपादीत करण्यात आली आहे. सदर शेतकऱ्यांना रु.५ लक्ष प्रती हे. दराने सानुग्रह अनुदान देण्याबाबतचा निर्णय विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या ८५ व्या नियामक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

सानुग्रह अनुदान हे सरळ खरेदीने संपादीत भूधारकांना देण्यात येत असून, सरळ खरेदी प्रकल्पांमध्ये न्यायालयीन दाद मागण्याची मुभा नाही. सबब, नैसर्गिक न्यायाचे तत्व लागू करुनच सहानुभूतीपूर्वक निर्णय घेवून शासनाने विशेष बाब म्हणून सानुग्रह अनुदानाची मागणी मान्य केली आहे. सदरचे अनुदान वाटप करण्याकरीता क्षेत्रफळ, लाभधारक, मृत लाभधारकांचे वारसदार इत्यादी आवश्यक बाबींचे दृढीकरणासाठी आवश्यक दस्तऐवज आणि प्रतीज्ञालेख घेण्यात येत असून, त्यामुळे लाभधारकांच्या न्यायीक हक्कांचे हनन होत नाही. या कायदेशीर बाबींची पूर्तता करुन सानुग्रह अनुदान देण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आरटीई अंतर्गत खाजगी शाळांना मिळणाऱ्या शुल्क प्रतिपूर्तीबाबत**

**(३२) * ८३८१ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार खाजगी शाळांमध्ये वंचित व दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना २५ टक्के जागांवर मोफत प्रवेश दिला जात असून, शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये प्रति विद्यार्थी रू.१७,६७०/- या

दराने शुल्क प्रतिपूर्ती करण्यास शासनाने मान्यता दिल्याचे दिनांक ८ मे, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शुल्क प्रतिपूर्ती रकमेत गेल्या अनेक वर्षांपासून कोणतीही वाढ करण्यात आलेली नसल्याने वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर खाजगी शाळांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार महागाईचा विचार करून प्रतिपूर्ती रक्कम वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) आरटीई अंतर्गत खर्चाच्या शुल्क प्रतिपूर्तीचा दर कोविड-१९ नंतर सन २०२३-२४ पासून रु.१७,६७०/- इतका निश्चित केलेला आहे. या दरानुसारच शाळांना आरटीई २५ टक्के प्रतिपूर्तीची रक्कम देण्यात येते. आरटीई २५ टक्के अंतर्गत प्रवेश देताना शाळांनी सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून वंचित व दुर्बल घटकातील मुलांना २५ टक्के जागांवरील शिक्षण देणे अपेक्षित आहे. यामुळे महागाई भत्त्याचा विचार करून आरटीई २५ टक्केच्या दरात वाढ केली जात नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खडकवासला संयुक्त धरण प्रकल्पाच्या सुरक्षिततेबाबत

**(३३) * ७५११ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकवासला संयुक्त प्रकल्पांतर्गत खडकवासला, पानशेत, वरसगाव व टेमघर या धरणांचा एकूण उपयुक्त जलसाठा सुमारे २९.१५ टीएमसी असूनही या धरणांच्या संरक्षक व्यवस्थेत गंभीर त्रुटी असल्याचे वारंवार निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे शहरातून पानशेतकडे जाणारा मुख्य रस्ता खडकवासला जलाशयालगत असून या भागात चौपाटी, पर्यटनस्थळ व नागरिकांची मोठया प्रमाणावर वर्दळ असून अशा ठिकाणी सध्याची सुरक्षा यंत्रणा अपुरी ठरत असल्याने सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खडकवासला जलाशयात औषधांचे बॉक्स फेकले गेल्याची गंभीर घटना दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ रोजी घडल्याचे निदर्शनास आले, यामुळे जलप्रदूषणासह सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला आहे, हे ही खरे काय,
(४) असल्यास, खडकवासला जलाशयाची लांबी अंदाजे २३ कि.मी. असूनही जलसंपदा विभागाकडील सुरक्षा व देखरेख यंत्रणा अत्यल्प असल्याने भविष्यात संभाव्य धोका वाढण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, खडकवासला जलाशय परिसरातील स्वच्छता, सुरक्षितता आणि देखरेखीबाबत पाटबंधारे विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर प्रकरणी दुर्लक्ष करित असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने केली वा करण्यात केली तसेच जलसाठयाच्या सुरक्षिततेसाठी यंत्रणा सक्षम करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

खडकवासला संयुक्त प्रकल्पातील खडकवासला, पानशेत, वरसगाव, टेमघर या धरणांचा समावेश असून त्याचा एकूण उपयुक्त जलसाठा २९.१५ टिएमसी एवढा आहे.

खडकवासला संयुक्त प्रकल्पांतर्गत धरणांच्या सुरक्षेसाठी पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळामार्फत सद्य:स्थितीत खडकवासला धरणावर २३, पानशेत धरणावर ११, वरसगाव धरणावर १० व टेमघर धरणावर ६ असे एकूण ५० सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आलेली असून सदर सुरक्षा रक्षकांमार्फत आठ तासांच्या ३ शिफ्ट मध्ये धरणांची सुरक्षा केली जात आहे.

तसेच खडकवासला धरणाच्या सुरक्षेसाठी ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले असून धरणाच्या डाव्या बाजूस पोलिस सुरक्षा चौकी असून पोलिस विभागामार्फत २४ तास सदर ठिकाणची निगराणी केली जाते.

(२) हे खरे नाही.

खडकवासला जलाशयालगत पुण्याहून येणारा पानशेत कडे जाणारा रस्ता आहे. सदर जलाशयाच्या कडेने चौपाटी असून पर्यटक / नागरिक यांची वर्दळ असते, तथापि पोलीस विभागाच्या समन्वयाने धरणाच्या सुरक्षिततेबाबत दक्षता घेण्यात येते.

(३) होय, हे खरे आहे.

दि.१७-१०-२०२३ रोजी खडकवासला जलाशयात औषधांचे बॉक्स पाण्यात टाकल्याचे निदर्शनास आले. त्यावर क्षेत्रीय अधिकारी यांनी पोलिस निरीक्षक, सिंहगड रोड पोलिस स्टेशन येथे संबंधितांवर दि.१९/१०/२०२३ रोजी रितसर (F.I.R) गुन्हा दाखल केला आहे. तसेच याबाबत पोलिस प्रशासनाने त्याचा पंचनामा देखील केलेला आहे.

(४) व (५) खडकवासला धरणाचे पाणलोट क्षेत्र सुमारे २६ कि.मी. लांबीपर्यंत पसरलेले असल्याने त्याची व्याप्ती फार मोठी आहे. खडकवासला धरणाच्या बुडीत क्षेत्रातील धोक्याच्या ठिकाणी संरक्षण भिंती बांधण्यात आलेल्या आहेत. तसेच धरण परिसरात सूचना फलकही लावण्यात आलेले आहेत.

धरणाच्या डाव्या बाजूस पोलिसांची सुरक्षा चौकी असून पोलिस विभागामार्फत २४ तास सदर ठिकाणची निगराणी केली जाते. तसेच धरण व जलाशय परिसरामध्ये पर्यटनामुळे नागरिकांचा वावर वाढल्यानंतर नजिकच्या हवेली पोलीस स्टेशनशी संपर्क साधून पोलीस विभागाच्या समन्वयाने धरणाच्या सुरक्षिततेबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

त्यामुळे खडकवासला जलाशय परिसरातील सुरक्षितता व देखरेखीबाबत जलसंपदा विभागाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे अशी वस्तुस्थिती नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना कर्जवाटपासाठी बँकांकडून लावलेली सिबिलची अट रद्द करण्याबाबत

**(३४) * ११२६७ श्री.श्याम खोडे (वाशिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.कैलास घाडगे पाटील (धाराशिव), श्री.गजानन लवटे (दर्यापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना सिबिलची अट न लावता बँकांकडून कर्जवाटप करण्याच्या सूचना मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तरीय बँकर्स कमिटीच्या बैठकीत दिली असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये

निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना पीककर्ज वाटप करण्यासाठी बँकेद्वारे शेतकऱ्यांचे सिबिल स्कोअर तपासणे, अधिकची व जाचक कागदपत्रांची मागणी करणे, तसेच कर्ज वाटपात होणारी दिरंगाई इत्यादी कारणामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या अमरावती जिल्ह्यातील तब्बल दोन लाख शेतकऱ्यांनी माहे मार्च, २०२५ मध्ये सावकारांकडून रुपये २५५ कोटी इतके कर्ज घेतले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांना कृषी कर्जाचा पुरवठा न करणाऱ्या बँकेवर एफ.आय.आर. दाखल करण्याचे आदेश दिलेले असतानाही अद्यापपर्यंत एफ.आय.आर. दाखल करण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ज्या शेतकऱ्यांनी त्यांच्या कृषी कर्जाची रक्कम तडजोडीअंती (O.T.S.) भरणा केली अशा शेतकऱ्यांना नव्याने कर्जपुरवठा करण्याचा कालावधी (Cooling Off Period) नावाखाली बँकेकडून कृषी कर्जाचा पुरवठा केला जात नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शेतकऱ्यांना पीक व कृषी कर्जाचा पुरवठा झाला नाही तर त्यांचे दुष्परिणाम अर्थव्यवस्थेबरोबरच शेतकरी आत्महत्यांमध्ये होत असून सर्व बँकांनी लावलेली सिबिलची अट रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) होय.
(२) नाही,
पीक कर्ज वाटप करीत असताना बँकांकडून सिबिल स्कोअरची तपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भात कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये अमरावती जिल्ह्याकरीता खरीप हंगामासाठी रु.१६४५ कोटी इतका लक्षांक निश्चित करण्यात आला आहे. त्यापैकी दिनांक १५.०६.२०२५ पर्यंत ६८,६१३ शेतकऱ्यांना रु.९६८ कोटी रकमेचे पीक कर्ज वाटप बँकांनी केले असून लक्षांक पूर्तता ५९ टक्के आहे. खरीप पीक कर्ज वाटपाची कार्यवाही सध्या सुरु आहे.
तसेच अमरावती जिल्हयामध्ये परवानाधारक सावकारांकडून कृषी कर्ज वाटप करण्यात आलेले नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही,
चालु हंगामात बँकांनी सिबिल स्कोअर मागणी केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(४) नाही,
जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमार्फत थकीत/अनुत्पादित कर्जाच्या वसुलीसाठी एकरकमी परतफेड योजना राबविण्यात येत आहे. अशा योजनेचा लाभ घेऊन कर्जखाती निरंक झाल्यानंतर संबंधित व्यक्तीस नवीन कर्ज घेण्यास कोणतेही प्रतिबंध नाहीत. तसेच शासनाने जाहिर केलेल्या कर्जमाफी योजनेमध्ये जर कर्जखाते निरंक झाले असेल तर अशा शेतकऱ्यांना कर्ज खाते निरंक झाल्यापासून नव्याने कर्जपुरवठा करेपर्यंतचा कालावधी (कुलिंग पिरियड) न ठेवता कर्जपुरवठा करण्यात येतो. त्या व्यतिरिक्त बँकांनी स्वत:च्या अखत्यारित केलेल्या शेतकऱ्यांच्या कृषी कर्ज तडजोडीसंदर्भात सदरील शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्याकरीता बँकांची अंतर्गत धोरणे आहेत व त्या धोरणांनुसार पात्र शेतकऱ्यांना पीक कर्ज पुरवठा केला जातो.
(५) भारतीय रिझर्व्ह बँकेने दिनांक २८.०१.२०१५ रोजीच्या परिपत्रकान्वये बँकांनी कर्ज मंजूर करताना संबंधित कर्जदाराकडून थकबाकी नसल्याचा दाखला (No Dues Certificate) घेण्याऐवजी संबंधित कर्जदाराची पत, परतफेड क्षमता व परतफेडीचा भुतकालीन व्यवहार इ. बाबी तपासण्यासाठी सिबिल अहवालाचा वापर करण्याबाबत सूचित केले आहे. सदर सुचनेनुसार बँकांमार्फत शेतकऱ्यांना पीक कर्ज मंजूर करताना सिबिल स्कोअर विचारात न

घेता, सिबिल अहवाल विचारात घेण्यात येतो.

त्याचप्रमाणे मा.मुख्यमंत्री महोदय यांनी राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या दिनांक १९.०५.२०२५ रोजीच्या सभेमध्ये बँकांना पीक कर्ज वाटप लक्षांक पुर्ततेच्या सूचना दिल्या आहेत. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना पीक कर्ज मंजूर करताना सिबिल स्कोअरचा वापर न करण्याबाबत सूचित केले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई विद्यापीठाच्या एल.एल.बी. परीक्षेतील चुकीच्या प्रश्नपत्रिकेबाबत**

**(३५) * ८३८५ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाच्या विधी (एल .एल.बी.) अभ्यासक्रमाच्या परिक्षांमध्ये चेंबूर येथील एका महाविद्यालयात परिक्षा सुरु असताना विद्यार्थ्यांना चुकीची प्रश्नपत्रिका देण्यात आल्याचे दिनांक ७ मे, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तृतीय वर्ष सहावे सत्र व पाचवे वर्ष दहावे सत्र यातील परीक्षेदरम्यान भारतीय साक्ष अधिनियम या विषयाची प्रश्नपत्रिका देणे अपेक्षित असताना त्याऐवजी कालबाह्य पुरावाविषयक कायद्याची प्रश्नपत्रिका देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घटनेमुळे विद्यार्थ्यांना नाहक मनस्ताप सहन करावा लागलेला असून, या प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.
मुंबई विद्यापीठातर्फे विधी (एल.एल.बी.) अभ्यासक्रमाची परिक्षा दि. १९/०४/२०२५ रोजी आयोजित केली होती. या परिक्षेदरम्यान चेंबूर कर्नाटक विधी महाविद्यालयात भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ Including Forensic या विषयाऐवजी Law of Evidence या विषयाची प्रश्नपत्रिका वितरीत करण्यात आल्याची तक्रार विद्यापीठास प्राप्त झाली.
(३) व (४) सदर तक्रारीची विद्यापीठाकडून पडताळणी केली आहे. चेंबूर कर्नाटक विधी महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर Law of Evidence या विषयासाठी पुनर्परिक्षार्थी तर भारतीय साक्ष अधिनियम २०२३ Including Forensic या विषयासाठी परिक्षार्थी उपस्थित होते. विद्यापीठाकडून दोन्ही विषयाच्या प्रश्नपत्रिका केंद्राकडे पाठविल्या होत्या परंतु महाविद्यालयाने भारतीय साक्ष अधिनियम २०२३ Including Forensic या विषयासाठीची प्रश्नपत्रिका डाऊनलोड न करता केवळ Law of Evidence या विषयाची प्रश्नपत्रिका डाऊनलोड करून परिक्षार्थींना वितरीत केली होती.

दोन्ही विषयाच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांमध्ये ९० टक्के साधर्म्य असल्याने ज्या परिक्षार्थींनी Law of Evidence ची प्रश्नपत्रिका सोडविली अशा परिक्षार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन त्यानुसारच करुन त्यांना प्राप्त

झालेले गुण Bharatiya Sakshya Adhiniyam २०२३ Including Forensic या विषयाला प्रदान करण्यात यावेत असा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांचे कोणत्याही प्रकारे शैक्षणिक नुकसान होणार नाही.

सदर प्रकरणाचा तपास करण्यासाठी विद्यापीठाकडून डॉ. अनिल कुमार सिंग, अधिष्ठाता आंतरविद्याशाखा यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित महाविद्यालयावर दंडात्मक आणि शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबतची प्रक्रिया सुरू आहे

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.